International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# बंजारा समाजाच्या जवारातील (तिज) स्त्री दर्शन व लोकगीते

**प्रा. उदयसिंग दशरथ चव्हाण**
*स्व. रा. भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी*
*Corresponding Author – प्रा. उदयसिंग दशरथ चव्हाण*
DOI - 10.5281/zenodo.15251057

**प्रस्तावना :**

तीज उत्सवासाठी बंजारा समाजात श्रावण महिना महत्वाचा मानला जातो. बंजारा समाज पूर्वी लदेणी काळात उदरनिर्वाहासाठी सतत भटकंती करीत असत. बंजारा जमातीच्या वाटयाला सतत भटकनेच असायचे. पूर्वीच्या काळात लग्न झालेल्या मुलीची पुन्हा भेट होण्याची शक्यता फार कमी असायची, त्यामुळे त्यांना दु:खाचा विसर पडावा. त्यांची पुन्हा भेट व्हावी. म्हणून तीज उत्सव साजरा केला जात होता. कालांतराने बंजारा समाज तांडयात वस्ती करुन राहु लागला. व त्यांच्या सण उत्सवात अधिक भर पडू लागली. तीज हा उत्सव अविवाहित मुलीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मानला जातो. हा तीज उत्सव तांडयातील लग्नास योग्य किंवा उपवर मुलींचा मानला जातो. या उत्सवप्रसंगी तांडयातील स्त्रियाही नाचगाण्यात सहभागी होतात. आषाढ महिन्यापासूनच बंजारा तरुणी रानोमाळ विविध पारंपारिक लोकगीते गायला सुरुवात करतात. तीज म्हणजे एका छोटया परडीत माती टाकुन त्यात पेरलेले गहू व त्याचे निघालेले अंकुर होय. तीज हा उत्सव श्रावण महिन्यात येणाऱ्या नारळी पोर्णिमेच्या (रक्षाबंधन) (राखी पोर्णीमा) दिवसापासून ते श्रीकृष्णजयंती गोपाल कालापर्यंतचा नऊ किंवा अकरा दिवसाचा हा उत्सव असतो.

**नायकाची परवानगी:**

हा तीज उत्सव साजरा करण्यापूर्वी तांडयातील तांडाप्रमुख नायकाची परवानगी घेणे अनिवार्य असते. त्याशिवाय तांडयातील मुली हा तीज उत्सव साजरा करु शकत नाहीत. तीज उत्सव साजरा करण्यासाठी नायक (तांडाप्रमुख) सभा आयोजित करीतो. ताडयांतले प्रत्येक व्यक्ती नायकाच्या घरी जमतात. नायक (तांडाप्रमुख) कारभारी, आसामी (तांडयातील इतर लोक ) एकत्र येतात. आणि सभेत सहमती दिल्यानंतरच उत्सव साजरा केला जातो. या तीज उत्सवाला नायकाने परवानगी दिल्यानंतर तरुणीचा आनंद उत्साह व्दिगुणित होतो.

या उत्सवाची वातावरण निर्मिती करण्यासाठी स्त्रिया आपल्या पारंपारिक लोकगीताला सुरवात करतात

**"झरमरीया बरसो ये नाणी मोठी बुंदे पड,**
**काई पांळी पडरो ये याडी बाई दडीयाती,**
**राधिका भिजागी ये याडी बाई दडीयाती"........**

श्रावन महिन्याच्या रिमझिम वर्षाव करणारा पाऊस त्यात तिज उत्सव असल्यामुळे मुलीच्या आनंदाला पारावर उरत नाही. अशा वेळी मुलगी आपल्या गीतेतून श्रावन महिन्यात पडणाऱ्या पावसाचे वर्णन करून सांगते, आणि त्या श्रावण सरीत राधिका भिजून ओलीचिंब झाली आहे. असा आनंदोत्सव गीतेतून साजरा करते.

आज माझा जीव (जीवडा) हर्षोल्हासित झाला आहे. अशी ती म्हणते.

अशा या अविरत गायिल्या जाणाऱ्या लोकगीतामूळे तांड्यात तिज उत्सवासाठी अनोखे वातावरण निर्माण होते. असे वातावरण निर्माण झाले कि मुली नायकाकडे जातात, या प्रसंगी मुली गीत गातात ते या प्रमाणे

**"नायक सुतोचीक जागो रे |**
**मारू छेवट्या तारी निंद वराडू रे ||**
**नायकंळ सुतीचीक जागी ये |**
**मारू छेवट्या तारी निंद जगाडू ये ||**
**छोरी आयीरे तारे तांडेम |**
**आब छोरीन तिज चायगो" ||**

ज्या मुली विवाहयोग्य किंवा उपवर (जाऊवा) आहेत अशा मुली नायकाच्या घरी जातात. आपल्या गीतेतून झोपी गेलेल्या नायकाला उठवतात आणि तिज या उत्सवाची मागणी करतात.

तांड्याच्या नायकाने तिज उत्सवाला परवानगी दिल्यांनतर मुलीच्या आनंदाला पारावर उरत नाही, आणि त्या मुली नायकाच्या घरी फेर धरून नाचायला सुरवात करतात.

या प्रमाणे बंजारा तरुणी तीजोत्सवाला सुरवात करताना जणू मंगलाचरणच म्हणतात. अशा प्रकारे मुलीच्या नृत्यगायनाला रंग चढतो.त्यानंतर तांड्यातील स्त्रियांना राहवल्या जात नाही, त्याही त्यांच्यात मिसळून गीत गातात व नाचायला सुरवात करतात.

**काळी माती आणण्यासाठी जाणे:**

त्यानंतर दुसऱ्या दिवशी तिज पेरण्यासाठी सर्व मुली माकोड्यानी काढलेली माती घेण्यासाठी जातात या मातीने तिज रोपट्याची झपाटयाने वाढ होते, माती घेण्यासाठी जाताना गायिले जाणारे गीत

**"मकोडा धूड काढो जलदिसरे,**
**हारो मकोडा तोडू ककोडा,**
**हामारे मकोड्यान काईमत कीजो,**
**हारे मकोड्या लालजी.............**

माकोड्याला लवकर माती काढण्यासाठी मुली विनंती करतात. त्याचे गुण गातात. त्यांनी काढलेली मातीच तिज या रोपट्यासाठी उपयुक्त ठरते. मुली तसेच ती जमा करण्यापूर्वी मातीत भिजवलेल हरभऱ्याचे दाने बोरीच्या काट्यात खोचतात आणि प्रदक्षिणा घालतात. व याप्रसंगी पारंपारिक गीत म्हणतात. या गीताला 'बोरडी झुडेर' गीत असे म्हणतात ते असे

**"बोरडीर बोर खाटे मीठे बोर,**
**कनुर कनियावो चरमटडी,**
**तम लागजाजो, तम झडजाजो,**
**कनुर कनियावो चरमटडी,**
**काई चाळो लगाई ये चरमटडी...........**

हा श्रावण महिना बोर पिकण्याचा मौसम नसतो. पण या वेळी बोराच्या झाडाला तुरळक बारीक कच्चे-पक्के आंबट-गोड बोरे येतात. अशा या बोरीचे बोर हो ! तुम्ही लागा आणि झडून जा. या बोरानी चाळे (चाळो) लावले आहे. त्या नायकाच्या खिशात गुंजा (चरमटडी) आहेत.

या मुलीचा समूह तांडयातील देवस्थानावरुन नायकाच्या घरी येतो. नायकाच्या पत्नीने भिजू घातलेले गहू आपापल्या दुरडीत पेरतात. नंतर मुलीचा समुह तीज पेरल्या नंतर रात्री खुप वेळाने आपआपल्या घरी परततो. तरीही त्यांचा उत्साह कायम असतो.

**जवाराला पाणी टाकणे:**

दुसऱ्या दिवशी सकाळी उठुन मुलीचा समूह दुरडीतल्या तिजेवर पाणी शिंपडण्यासाठी आणी पाणी आणण्याकरिता मुलींच्या झुंडी नदी,नाला विहिरीवर जातात. तेव्हा गीत गातात ते असे

**कुळंसे तांडेती आयी ये सोनकी ।**
**मोहणा रो दल भिजेगो ॥**
**बापुरे तांडेती आयी ये सोनकी**
**माहेणा रो दल भिजेगो ॥**

बंजारा समाजाचे कुलदैवत संत श्री सेवालाल महाराज हे आहेत. तुम्ही कोणत्या तांडयातून आल्यास असे प्रश्न विचारल्यावर त्या मुलींचा समूह मोठया अभिमानाने सेवालाल महाराजांचे (बापू) नाव घेऊन सांगतात. की आम्ही बापूच्या तांडयावरुन आल्या आहेत. तसेच जवारावर पाणी टाकतांना सुध्दा

पहिल्याच दिवशी सेवालाल महाराजांचे नाव घेऊन पाणी शिंपडतात.

**लिया लिया ये बापू रो नाम / जेरे पच नाकीया धार**
**तसेच हारो हारो जवार ये।**
**गंहूला डे डे डेरीयो**
**तोन कुंळे पेरायो ये।**
**डोरी डो येर फूल**
**तोन बापू पेरायोये।**
**डोरी डो येर फूल**

हे बहरुन आलेली तीज । तुला कोणी बोलावले आहे कोणी परवानगी दिली आहे ते सांग. तुला माझ्या वडिलांने बोलाविले आहे. ही हिरवी तीज (जवारा) बहरुन आली आहे (डेडरियो)

**"घंऊला घमको पडचीक कोणी रे**
**घंऊला कुणसी बाई रो विरा रे**
**घंऊला आपणी बाई रो विरा रे**
**घंऊला घमको पडचकीक कोणी रे**

मुली जवाराला म्हणते हे तीज (धंऊला) माझ्या नृत्यगायनाचा नाद ऐकू येतो की नाही? हे तीज तु कोणत्या बहिणीचा भाऊ (विरा) आहेस.

**"मारो छोटोसो फुंदळाये घेरो घमको पड,**
**मारो मातेरी लोवडी ये, घुंघटो सरक पड,**
**मारो नाके रो भुरीया ये, भुरीया रमळ पड..........**

हे माझ्या तीज मी तुझ्याभोवती नृत्याचा फेर धरला आहे. नृत्य करतांना ओढणीच्या काठापदराला लावलेला लहान (छोटेसो) रेशमाच्या गोंडयाचा (फुलकुंदळा) नाद ऐकू येतो, तोही ताल धरतो आहे. त्याचबरोबर माझ्या

डोक्यावरची ओढणी (लोवडी) घुंघट, गळयातील अलंकार (हासली), नाकातील (नाकेरो) नथ (भुरीया), हातातील अलंकार (बायटा) माझ्या नृत्याबरोबर ताल धरुन नृत्य करीत आहेत.

**पाळणा वरची गाणे:**

अशाप्रकारे तिजेवर पाणी शिंपडण्याचे कार्यक्रम दररोज सकाळी, संध्याकाळी नऊ दिवसापर्यंत सुरु राहतो. या नऊ दिवसात तरुण मुली नाच-गाण्यात दंग होतात. भावाला झुला घालून देण्यासाठी विनंती करतात. भावाला गीतेतून झुला घालून मागतानाचे गीत

**विरेंळा पालळेरी खाड उंडी खोदो रे।**
**विरेंळा सागुनारी झाडी मत तोडोरे**
**विरेंळा साखळ लगावो सोनेरी रे।**
**विरेंळा बाईन बलावो हुसेती रे।**

उपवर मुली आपल्या भावाला झुला (झोपाळा) बांधून मागतात. त्यासाठी लागणारा लाकूड हा सागाचा नसावा खांब चांदीचे असावे. त्याला साखळ सोन्याची असावी, अश्या भावना मुली आपल्या गीतेमधून व्यक्त करतात. म्हणजे वृक्षतोड करु नका, पर्यावरणाचा ऱ्हास होईल असा संदेश मुली आपल्या गीतेतून देतात. सतत नऊ-दहा दिवस मुली या तीन उत्सवाने वेडावून या झोपाळयावर गीत गातात. या गीतांना बंजारा बोलीत

'हिंदोळेर गीत म्हणतात, (अशी काही लोकगीते खालील प्रमाणे सांगता येतील.) लग्नाला आलेल्या मुलीचे दु:खद चित्रणही काही गीतेमधून येते. त्या उपवर मुलीची ती शेवटची तीज (जवारा) तिला मिळणार नसते. म्हणून ती मुलगी आपल्या मैत्रिणीला दु:ख अंतकरणाने आपला भाव व्यक्त करतांना सांगते.

**सातंळो पिळीया पि लोळेरी वेल ये।**
**सातंळो पांळीयान जाजो मोती बोलजो।**
**सांतळो धोयेन जाजो मोती बोलजो**
**सांतळो एकी लुंगे न दोई खाया ये**
**सांतळो पिळीया पिलोळेरी वेल ये।**
**सांतळो काळ पडे भम जाया ये।**
**सांतळो सकाळ पडे मल जाया ये।**

सख्यांनो ! (सातणो) पाण्यासारखी (पिळोंणेरी रानवेल) वेल बारा महिने हिरवी राहणारी असते तशा तुम्ही सुध्दा सदा सुखी रहां ! अशा माझ्या सख्यांनो पाण्यासाठी जातांना मला (माती) सांगा (बोलजो). हे सख्यांनो धुण्यासाठी जातांनासुध्दा मला सांगा, एक लवंग (लुंगेन) आपण दोघी (दोई) खाऊ. तसेच लग्न झाल्यानंतर सासरला जावचं लागणार आहे. परंतु अशाच सुखद प्रसंगी पून्हा भेटता येईल असा भाव व्यक्त करतात.

**गणगौर:**

जवारा विसर्जनाच्या आधी रात्रभर मुला-मुलींचा खेळ चालतो. त्या रात्री कृष्णभगवान व राधेची मूर्ती तयार करतात. यालाच गणगौर म्हणतात. अविवाहीत मुली पाट (पिडीया) व द्रोण (दोणा) अविवाहीत मुलांना पाट घेण्यासाठी बोलावतात बोलावतानांचे गीत **'झुलरेम आजो रे झाडीया बाजू बंद रो चुडीया'** नंतर एक मुलगा हातात पाट घेवुन मुलीच्या समुहात उभा राहतो. मुली चहूबाजूंनी फेर घालून नाच करतात व मुलाच्या हातातील पाट हिसकावतात. मुलगा पाट देत नसेल तर लाडी-गोडीने, प्रेमाणे गीत गात मागणी करतात

**देद देद रे दयाळू वीर,**
**पिडीया देद र ॥२॥**
**तोन गामेरो पटल्या करु रे विर**
**पिडीया देद र –**
**तोन होळीवेन वाया करावू रे विर**
**पिडीया देद रे-**

अशाप्रकारे मुली मुलाला पाट देण्याची विनवणी करतात. देत नसेल तर प्रसंगी त्या मुलाला मार सुध्दा देतात. शेवटी मुलाने पाट दिल्यानंतर मुली गीतेतून शिव्या देतात.

**खोसलाई सांतळो पिडीया, बाजूबंद रो चुडीया**
**रोवू रोवू करेलागो झाडीया। बाजूबंद रो चुडीया**
**विचकालिदो याडी झाडीया। बाजूबंद रो चुडीया |**
**लिकाळेती कोणी खोसायो मारो पिडीया |**
**जुवांळेती कोणी खोसायो मारो दोणा |**
**हामारो पिडीया हामारे साथ ।**
**ये छोरा री, छातीत प लात ये ।**

शेवटी आपला विजय झाल्याचा आनंद मुली साजरा करतात.

**तीज विसर्जन:**

**चाली चाली रे दयाळु वीर,**
**आज म चाली रे**
**तारी खिसियाम रखल वीर**
**आज म चाली रे**
**मारी सांतळू रे कारणा ये**
**आली-गली हिंडतीती**
**किमेती आयो वेरी खाळिया ये**
**मारी सांतळू न ले चालो**

असे गीत गात मुली आपले दु:ख व्यक्त करतात. शेवटी तीज व गणगौर ह्या दोन्ही नदीच्या पात्रात विसर्जित करतात अश्या प्रकारे हा तीजोत्सव हर्षोउल्हासाने संपन्न होतो.

**निष्कर्ष:**

१) बंजारा समाज आजही पारंपारिक पध्दतीने तिज उत्सव साजरा करतात.
२) बंजारा ही जरी मौखिक भाषा असली तरी लोकगीतेत साहित्याचा साठा आजही तांडयात दिसतात.
३) नव्या पिढीतील तरुणी मध्ये लोकगीतेचा ऱ्हास दिसून येतो.
४) गरकला, गरकली लोकगीतांमधून शिवी, बोलणे असले तरी त्यांचा वाईटपणा फक्त मनोरंजनापुरता मर्यादीत असतो.

**संदर्भसूची:**

१) प्रा. डॉ. राठोड सुनिल- बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते.
२) राठोड आत्माराम कनिराम, 'तांडा' नितीन सरदार राजदुत प्रकाशन. रुईकर वाडी यवतमाळ. (आवृत्ती दुसरी २००२)
३) नाईक मोहन, 'गोरमाटी संस्कृती आणि संकेत' सोनाली प्रिंटर्स (प्रथम आवृत्ती २००१).
४) पाटील बळीराम, 'गोर बंजारा लोकांचा इतिहास' श्याम ब्रदर्स, सुभाष रोड नागपुर (प्रथम आवृत्ती १९३६).
५) चव्हाण रामनाथ, भटक्या विमुक्त्यांचे अंतरण, सुगावा प्रकाशन, पुणे. (प्रथम आवृत्ती १९८९).
६) लोहकरे संजय, 'लोकसाहित्य आणि लोकजीवन' सुगावा प्रकाशन, पुणे. २०१५.